# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.
दूरध्वनी – 22620601, 22690602, 22641150/51, फॅक्स – 22692102.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Internet : www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/ महत्वाचे

क्रमांक : १०/एनजीपी/पीसीआय/प्रवेश/२०१८/ ८३६
दिनांक : 19 JUL 2018

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून औषधनिर्माणशास्त्र हा पदविका अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी / सुरु असलेल्या ज्या संस्थांनी फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांचे मान्यता प्रमाणपत्र किंवा मान्यता नसलेल्या संस्थांनी सदर मान्यता ६ महिन्याच्या कालावधीत सादर करणेबाबतचे हमीपत्र सादर न केलेल्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ चे प्रवेश प्रक्रीयेतून वगळणेबाबत....

संदर्भ : १. संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०१८-१९/६२३, दि.: २२.६.२०१८.
२.संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०१८-१९/६२६, दि.: २३.६.२०१८.
३.संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०१८-१९/७२१, दि.: ३.७.२०१८.
४.संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : १०/एनजीपी/मान्यता/२०१८-१९/७२६, दि.: ४.७.२०१८.

उपरोक्त विषयाबाबत संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थांना कळविण्यात आलेले होते की, ज्या संस्थांना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाची नवीन संस्था सुरु करण्यास, विद्यमान पदवी औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या संस्थेत पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम सुरु करणे, सुरु असलेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांच्या प्रवेशक्षमतेत वाढ करणे, विद्यमान पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या मान्यतेस मुदतवाढ (EOA) यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांची मान्यता मिळालेली आहे, अशा संस्थांनी संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली असल्यास सदर मान्यता पत्र अथवा मान्यता घेतलेली नसल्यास संदर्भ क्रमांक १ वरील परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेले नोंदणीकृत हमीपत्र संचालनालयास तात्काळ सादर करावे.

तथापि, असे निदर्शनास आलेले आहे की, उपरोक्त विषयांकित मान्यता मिळालेल्या पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाच्या काही संस्थांनी संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली असल्यास सदर मान्यता पत्र अथवा मान्यता घेतलेली नसल्यास संदर्भ क्रमांक १ वरील परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेले नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास/ संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयास सादर केलेले नाहीत. अशा सर्व संस्थांना कळविण्यात येते की, संबंधीत संस्थांनी सदर पत्राच्या दिनांकापासून दोन दिवसांच्या आत संस्थेतील औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करीता फार्मसी कौन्सिल ऑफ इंडीया, नवी दिल्ली यांची मान्यता घेतलेली असल्यास सदर मान्यता पत्र अथवा मान्यता घेतलेली नसल्यास संदर्भ क्रमांक १ वरील परिपत्रकासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेले नोंदणीकृत हमीपत्र सादर केले नाही तर सदर संस्थांच्या संबंधित पदविका

औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमाचा समावेश शैक्षणिक वर्ष २०१८-१९ च्या प्रवेश प्रक्रियेत करण्यात येणार नाही व यास सर्वस्वी संबंधीत संस्था जबाबदार राहील, याची नोंद संबधीत संस्थांनी घ्यावी

(प्रमोद नाईक)
सहसंचालक,
तंत्र शिक्षण संचालनालय, म.रा. मुंबई

प्रत : माहिती व कार्यवाहीसाठी.

१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे, यांना कळविण्यात येते की, सदर बाब आपल्या अखत्यारीतील पदविका औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम राबविणाऱ्या संस्थांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.
२. संबंधित सर्व संस्था (संचालनालयाच्या संकेतस्थळावरून),
३. कार्यासन क्रमांक ३, मुख्य कार्यालय, मुंबई, यांना संचालनालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यासाठी.